

भाग-३

# कपडे दुरुस्ती

धावदोरा किंवा उलटी टीप घालण्यापेक्षा हेम टीप घालणे कधीकधी सोईचे असते.

अशा वेळी कापडाच्या किनारीचा भाग दुमडा. पुन्हा आणखी एक दुमड घाला. दुमडीवर प्रथम धावदोरा टाका. त्यामुळे दुमड बाजूला जाणार नाही.



© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४०० ००५.
प्रकाशक: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे - ४११ ०२९.


चित्रात दाखविल्याप्रमाणे
बोटांच्या चिमटीत कापड धरा
आणि दुमडलेल्या कापडातून
सुई वर काढा.
नंतर थोडे पुढे
सुई कापडाच्या दुमडीशेजारून
खालच्या कापडात खुपसा,
आणि दुमडीतून वर काढा.



पुन्हा थोडे पुढे
सुई दुमडीच्या शेजारी
खालच्या कापडात खुपसा
व दुमडीतून वर काढा.

असे पुन्हा पुन्हा करा.
अशा टाक्यांना हेम टीप
म्हणतात.




हेम टीप घालून पूर्ण झाल्यावर
धावदोरा काढून टाका.
म्हणजे केवळ हेम टीप उरेल.